# बेलोटात ११४०० रुपये वेतनवाढीचा करार

**सिन्नर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मुसळगाव औद्योगिक वसाहतीतील बेलोटा ग्री सोल्युशन्स लि. या कंपनीमध्ये आज (दि. ८) ११४०० रूपये वेतन वाढीचा करार करण्यात आला. या कंपनीत सिटू प्रणित नाशिक वर्कर्स युनियन असून युनियनचे पदाधिकारी व कंपनी व्यवस्थापन यांनी आज वेतन करारावर सह्या केल्या.



या करारानुसार कारखान्यातील सर्व कामगारांना चार वर्षासाठी ११,४०० रुपये वेतन वाढ मिळणार आहे. त्याचबरोबर शासनाच्या परिपत्रकानुसार महागाई भत्ताही मिळणार आहे. तसेच वर्षातील रजांमध्ये दोन रजांची वाढ करण्यात आली असून कामगारांच्या कुटूंबासाठी ५ लाखाचा मेडिक्लेम इन्शुरन्स व अपघाती विमा दहा लाख रुपये करण्यात आला आहे. कामगारांना दरवर्षी एका म हिन्याच्या पगारा इतका बोनस मिळणार आहे. त्याचबरोबर पंधरा वर्षे सेवा केलेल्या काम गारांना सर्व्हिस अवार्ड, स्वेटर इत्यादी लाभ मिळणार आहेत. या करारामुळे कामगारांचे वेतन आता ४०,८५० ते ४६,८५० इतके होणार असून हा करार संपताना कामगारांचा पगार ५० हजारापेक्षा जास्त होणार आहे.

आज कंपनीच्या आवारात करारावर सह्या करण्यात आल्या. पगारवाढ व इतर लाभाच्या करारावर कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने प्लांट हेड प्रशांत जोशी, दत्ता जाधव, जितेंद्र राजपूत, प्रवीण बोडके यांनी तर युनियनच्या वतीने सिटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, राज्य उपाध्यक्ष सिताराम ठोंबरे, जनरल सेक्रेटरी तुकाराम सोनजे, तालुका अध्यक्ष हरिभाऊ तांबे, संतोष कुलकर्णी, कमिटी मेंबर विलास जाधव, अजित लोखंडे, भारत गोळेकर, चंदर शितोळे, योगेश गायकवाड, सागर राजनोर, तुकाराम कडबाने यानी सह्या केल्या. करारावर सह्या होताच कामगारांनी फटाके वाजवून व एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला.

# खरीप हंगामपूर्व नियोजन कार्यशाळा

**सिन्नर (प्रतिनिधी)–** तालुका कृषी अधिकारी कार्यालय व राष्ट्रीय केमिकल फर्टिलाइझर्स यांच्या संयुक्त विद्यमाने रामकमल लॉन्सवर खरीप हंगाम नियोजन कार्यशाळा नुकतीच पार पडली.



राज्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या संकल्पनेतून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सकाळच्या सत्रात तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर नाठे यांनी कार्यशाळेमागील भुमिका विषद केली. पिंपळगावच्या कांदा व द्राक्ष संशोधन केंद्राचे डॉ. राकेश सोनवणे यांनी कांदा व टोमॅटो पिकाबद्दल मार्गदर्शन केले. कुंदेवाडीच्या कृषी संशोधन केंद्राचे डॉ. योगेश पाटील यांनी माती तपासणी, मका व सोयाबीन लागवड व उत्पादन तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली. राष्ट्रीय केमिकल फर्टिलाइझर्सचे चेतन पाटील यांनी त्यांच्या उत्पादनांबद्दल माहिती दिली. सुनील भिसे यांनी सोयाबीन ग्रामबिजोत्पादनाबद्दल व पाणी फाऊंडेशनचे अजिंक्य गुरव यांनी डिजिटल शेतीशाळा व गटशेतीबद्दल म ाहिती देऊन संबधित व्हिडिओ दाखवले. कार्यशाळेचे सूत्रसंचलन संदीप बच्छाव यांनी केले.

दुपारच्या सत्रात खालीलप्रमाणे लाइव्ह प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. त्यात माती नमुना काढण्याची पद्धत, सोयाबीन बियाणे बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता चाचणी, टोकन पद्धतीने सोयाबीन व मका लागवड, गादी वाफा पद्धतीने कांदा रोपवाटिका तयार करणे, हुमणी किड व्यवस्थापन लाईट ट्रॅपद्वार, फेरोमन ट्रॅप, स्टिकी ट्रॅप प्रात्यक्षिक, बीबीएफ तंत्रज्ञान पद्धतीने लागवड, कीटकनाशकांची सुरक्षित हाताळणी, फळबाग लागवड तंत्रज्ञान, जैविक निविष्ठा उत्पादन निर्मिती, जलतारा प्रात्यक्षिकाचा समावेश होता. कार्यशाळा पार पाडण्यासाठी तालुक्यातील सर्व मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांनी नियोजन केले व प्रात्यक्षिक डेमो शेतकऱ्यांना प्रत्यक्ष करून दाखवले.

# प्राणाची बाजी लावून देशाचे रक्षण करणारे भारतमातेचे भूषण- पटारे



**टाकळीभान (वार्ताहर)–** भारतीय सैन्य दलात विविध संकटांना सामोरे जात, आपल्या प्राणाची बाजी लावून देशाचे रक्षण करणारे जवान भारताचे भूषण आहेत. त्यांचा आपुलकीने सन्मान करणे हे आपले कर्तव्य असल्याचे मत बा.स. संचालक मयुर पटारे यांनी व्यक्त केले.

येथील योगेश शिवाजी पटारे हा सैन्य दलात (अग्निवीर) भरती झाला. त्याचा सन्मान कृषी उत्पन्न बाजार समिती, टाकळीभान उपबाजार आवारात ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आला. प्रसंगी पटारे बोलत होते. यावेळी संत सावताचे संचालक विलास दाभाडे, सेवा संस्थेचे चेअरमन एकनाथ पटारे, संजय पटारे, तुकाराम बोडखे, शिवाजीराव पटारे, शाखाधिकारी दिनकर पवार, सुभाष ब्राह्मणे, आनंद कांबळे, गणेश चितळकर, संदीप बनकर, नितीन दहे, सचिन दहे, वैभव दाभाडे, वैभव रणनवरे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# ६० हजार अनधिकृत बससेमधून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक

## परिवहनमंत्री सरनाईक यांच्या बैठकीत धक्कादायक माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात सध्या अधिकृतपणे ४० हजार स्कूल बसेस रस्त्यावर धावत असून दुसरीकडे सुमारे ५० ते ६० हजार बसेस अनधिकृतपणे धोकादायक पद्धतीने शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करीत असल्याची धक्कादायक माहिती गुरुवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आयोजित केलेल्या बैठकीत समोर आली. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत तक्रार केली आहे. या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देत लवकरच स्कूल बसेसच्या नियमावलीत सुधारणा करणार असल्याचे प्रताप सरनाईक यांनी जाहीर केले. तसेच शालेय विद्यार्थ्यांची अनधिकृतपणे वाहतूक करणाऱ्या बसेसवर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज यशवंतराव चव्हाण सभागृह येथे स्कूल बस असोसिएशन आणि पालक असोसिएशन यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीत बोलताना सरनाईक यांनी, स्कूल बसमधून शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखावह झाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या जीविताशी कोणीही खेळू नये. त्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

अनधिकृतपणे विद्यार्थ्यांची ने-आण करताना कारवाई केलेल्या स्कूल बसेसना पुढील तीन महिन्यांत दंडात्मक रक्कम भरून त्या बसेस अधिकृत करून घेण्याची संधी सरनाईक यांनी बस मालकांना या बैठकीत दिली. मात्र, ३ महिन्यानंतर ज्या प्रादेशिक परिवहन विभागांमध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत स्कूल बसेस आढळल्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनाही कठोर कारवाईला समोर जावे लागणार असल्याचे प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

परिवहन विभागानेही विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य दिले असून यासाठी स्कूल बसेसच्या नियमावलीत आवश्यक सुधारणा केल्या जातील. वाहन चालकांनी या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. नियमावलीत सुधारणा करताना वाहनचालक आणि पालक संघटनांच्या भावना आणि अडचणींचाही विचार केला जाईल. कोणावर अन्याय होणार नाही. पण नियमही शिथिल होणार नाहीत, असे सरनाईक यावेळी म्हणाले. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तर स्कूल बस धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या धोरणातील त्रुटी दूर केल्या जातील. आजच्या बैठकीत स्कूल बस असोसिएशन आणि पालक असोसिएशन यांनी मांडलेल्या सूचनांचा धोरणातील नियम सुधारणावेळी विचार केला जाईल, असे आश्वासन परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी यावेळी दिले. बैठकीला परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सिध्दीविनायकमध्ये जनआरोग्य योजना लागू

**सिन्नर (प्रतिनिधी)–** शहरातील सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरू करण्यात आली असून यामध्ये १५६ आजारांवर उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. अशी सुविधा देणारे सिध्दीविनायक हे तालुक्यातील पहिले हॉस्पीटल आहे. तालुक्यातील रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन हॉस्पीटलचे संचालक डॉ. दिलीप गुरुळे, डॉ. भूषण वाघ यांनी केले आहे.

प्रत्येक कुटुंबाला प्रति वर्ष ५ लाख रुपयांचे आरोग्य संरक्षण या सुविधेमूळे मिळणार आहे. या योजनेचा केशरी, पिवळे रेशन कार्ड, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजनेच्या कार्डधारकांसह पांढरे रेशन कार्डधारक कुटुंबेही लाभ घेऊ शकणार आहेत. या योजनेतून फुफुस विकार, संधिवात, पोटाचे विकार व शस्त्रक्रिया, जंतुसंसर्ग विकार, अतिदक्षता विभागतील आजार, नवजात शिशू उपचार, ह्दयरोग, मेंदूरोग विकार व शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, जळीत आजार, सर्व प्रकारचे अपघात, बालरोग उपचार व शस्त्रक्रिया, मूत्रविकार व शस्त्रक्रिया, स्त्रीरोग उपचार व शस्त्रक्रिया मोफत होणार असून त्यामध्ये मेडिकल, जेवण व परतीचा प्रवास समाविष्ट असणार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये वेगळा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या हॉस्पिटलमध्ये या व्यतिरिक्त मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून देखील उपचार केले जातात.

# मानमोडा धरणात देवनदीचे पूरपाणी सोडा

**सिन्नर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील देवपूरजवळील मानमोडा फाट्याजवळील बंधारा गेल्या काही वर्षांपासून कोरडा ठाक पडला असून खोपडीतील देवनदीवरील ब्रिटीशकालीन बंधाऱ्याचे पूरपाणी बंदीस्त पाईपलाईनद्वारे या बंधाऱ्यात टाकावे अशी मागणी परिसरातील चार गावातील शेतकऱ्यांनी कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली आहे.

सन १९७२ च्या काळात माजी आमदार स्व. सुर्यभान गडाख यांनी पूढाकार घेऊन या बंधाऱ्याचे (पाझर तलाव) काम केले होते. पावसाळ्यात पडलेल्या पावसाचे पाणी साठवण्याची मोठी सोय त्यामूळे झाली. बंधाऱ्यातील पाण्यामूळे परिसरातील दगडवाडी, देवपूर, किर्तांगळीसह खोपडीच्या काही भागाला या पाण्याचा उपयोग होत होता. त्यातून परिसरातील विहिरींच्या पाण्याची पातळी वाढल्याने काही वर्ष परिसरातील शेतील चांगले दिवसही आले होते. मात्र, त्यानंतर पावसाचे प्रमाण वाढल्याने या बंधाऱ्याकडे दुर्लक्ष झाले. त्यातून धरणात गाळ वाढला. वेळीच दुरुस्ती न झाल्याने पाण्याची गळती वाढली. पाण्याचा साठा कमी झाला. सिन्नर-शिर्डी महामार्गाचे काम सुरु झाल्यानंतर या बंधाऱ्यातील गाळ काढण्यात आला. बंधाऱ्याची खोलीही वाढवण्यात आली. त्यामूळे बंधाऱ्याची साठवण क्षमताही वाढली आहे.

# कृषी विभागाच्यावतीने हुमणी किडीचे एकात्मिक व्यवस्थापन कार्यशाळा

**राहाता (तालुकाप्रतिनिधी)–** पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखाना प्रवरानगर व कृषी विभाग तसेच कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर यांच्यावतीने राहाता तालुक्यातील दुर्गापूर येथे हुमणी आळी व्यवस्थापन करणे बाबतची शेतकऱ्यांची कार्यशाळा पार पडली.



हुमणी अळी अतिशय हानिकारक आणि सर्वत्र पसरलेली कीड असून या किडीमुळे ऊस, भुईमुग, बाजरी तसेच ज्वारी या पिकांचे खूप मोठे नुकसान होते. आळीचा प्रादूर्भाव झाल्यानंतर या किडीची अळी पिकांची मुळे खाते. त्यामुळे पिकांच्या पानांचा रंग पिवळा पडू लागतो. कालांतराने ही पाने वाळण्यास सुरुवात होते आणि शेवटी सर्व ऊस वाळून जातो. त्यामुळे उत्पादनात घट होते. संबंधित शेतकरी कार्यशाळेसाठी जैविक नियंत्रण केंद्र, प्रवरानगर येथील शास्त्रज्ञ डॉ.योगेश थोरात यांनी हुमणी नियंत्रण बाबत इत्यंभूत माहिती दिली त्यामध्ये हमणी आळीचा जीवनक्रम, त्यामधील अंडी, अळी, कोष आणि भुंगेरे अवस्था बाबत माहिती दिली. तसेच हुमणी अळी नियंत्रणाकरिता वळवाचा पहिला पाऊस झाल्यानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी एक प्रकाश सापळा लावावा. जेणेकरून आताचे भुंगेरे अवस्थेमध्ये हुमणीचे भुंगेरे वेचून ते नष्ट केले असता हुमणी आळीचे पुढील जीवनचक्र थांबते. उसाचे सप्टेंबर - ऑक्टोबर मधील होणारे नुकसान टाळले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रकाश सापळा लावण्याचे आवाहन केले.

तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी प्रत्येक शेतकऱ्यांनी एकात्मिक पद्धतीने हुमणी अळीचे नियंत्रण केले तर संपूर्ण गावातील शेतकऱ्यांचे उसाचे हुमणी अळीपासून होणारे नुकसान टाळता येईल. त्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी किमान एक प्रकाश सापळा आपले शेतात लावण्याचे आवाहन केले. कार्यशाळेसाठी संजय मोरे यांचे सहकार्य लाभले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी रमेश चोपडे, सरपंच नानासाहेब पुलाटे, प्रवरा ट्रक सोसायटी व्हा. चेअरमन सुनील जाधव, बाळासाहेब पुलाटे, बाळासाहेब लोहाळे, मच्छिंद्र पावडे, भास्कर पाटोळे उपस्थित होते.

## पान १ वरुन

### पाकच्या हल्ल्याला भारताचे चोख प्रत्युत्तर

याचे निर्माण रशियाची शस्त्र उद्योग कंपनी अल्माज-एंटेने केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जम्मू शहरात रात्री ८ च्या दरम्यान स्फोटांचे आवाज ऐकू आला. त्यानंतर तातडीने हवाई हल्ल्याचा इशारा देणारे सायरन वाजवण्यात आले. यानंतर काही सेकंदातच संपूर्ण शहरात वीजपुरवठा खंडित करण्यात आला आणि अवघ्या काही क्षणात ब्लॅकआऊट झाला. स्फोटाचा आवाज झाल्यानंतर तातडीने एस-४०० सुदर्शन या एअर डिफेन्स यंत्रणा तात्काळ सक्रीय झाली.

शेकडो ड्रोन हल्ले एका मागून एक असे परतावून लावले. जम्मूबरोबरच पाकिस्तानने पठाणकोट एअरबेसवरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण भारतानेही पाकचा हा प्रयत्न हाणून पाडला. पाकिस्तानच्या या सततच्या हल्ल्यामुळे खबरदारी म्हणून काश्मीर, पंजाबमधील अमृतसर शहरातही ब्लॅकआऊट करण्यात आला. हॉटेल्स आणि बाजारपेठेतील दिवे बंद ठेवण्यात आले आहेत. यानंतर शहरात एअर सायरन वाजवण्यात आले. नागरिकांना घरातच राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच राजस्थानातही पाकिस्तानचे दोन लढाऊ विमाने पाडली. याची कबुली पाक सैन्याकडून देण्यात आली.

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेतली. परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेश आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी एकत्रितपणे पत्रकार परिषद घेतली. यावेळी भारताकडून करण्यात आलेल्या कारवाईची सविस्तर माहिती देण्यात आली. पाकिस्तानकडून सीमाभागात सुरु असलेल्या गोळीबाराचीदेखील माहिती यावेळी देण्यात आली. पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या गोळीबारात आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेश आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी काय-काय कारवाई करण्यात आली याविषयी माहिती दिली. यानंतर परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली.

भारताने स्पष्ट केलं होतं की, पाकिस्तानच्या सैन्य ठिकाणावर हल्ला करण्यात आला नव्हता. तसेच भारताकडून सैन्य लक्ष्याला योग्य प्रत्युत्तर दिलं जाईल, असं बजावण्यात आलं होतं. ७ आणि ८ मे च्या रात्री पाकिस्तान भारताच्या उत्तर आणि पश्चिमेतील अनेक भागांमध्ये जसं की, अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालिंदर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगढ, नाल, फलौद, उत्तर लायी, भूज येथे ड्रोन आणि मिसाईलने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यांना इंटिग्रेटेड काउंटर यूएएफ ग्रीड आणि वायू रक्षा प्रणालीद्वारा निष्क्रिय केलं गेलं. या हल्ल्यांचे मलबा अनेक ठिकाणाहून गोळा करण्यात आले आहेत. ते पाकिस्तानच्या हल्ल्यांचे पुरावे आहेत, अशी माहिती कर्नल सोफिया कुरेश यांनी दिली.

काल सकाळी भारतीय सशक्त दलांनी पाकिस्तानच्या अनेक स्थलांवर वायु सुरक्षा रडार आणि प्रणालीला उद्ध्वस्त केलं. भारताची प्रतिक्रिया समान क्षेत्रात समान तीव्रतेने केली गेली. लाहोर येथे स्थित एका वायू संरक्षण प्रणालीला उद्ध्वस्त करण्यात आलं, असं कर्नल सोफिया कुरेश यांनी सांगितलं.

पाकिस्तानने नियंत्रण रेषेवर गोळीबार केला. कुपवाडा, बारामुल्ला, उरी, पुँछ, राजोरी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात तोफांनी हल्ला केला जातोय. पाकिस्तानी लष्कराच्या गोळीबारात आतापर्यंत १६ निष्पाप भारतीय नागरिकांचा मृत्यू झालाय. यामध्ये ३ महिला आणि ५ लहान मुलांचा समावेश आहे, अशीदेखील माहिती कर्नल सोफिया कुरेश यांनी दिली.

**पाकिस्तानचा गुरुद्वारवर हल्ला**

पाकिस्तानने दावा केला की, भारताने धार्मिकस्थळांना लक्ष्य केलं. पण तो दावा खोटा आहे. भारताने दहशतवाद्यांच्या तळावर हल्ला केला. याउलट पाकिस्तानकडून धार्मिक स्थळांवर हल्ला केला जातो. पाकिस्तानने जम्मू-काश्मीर येथील गुरुद्वारवर हल्ला केला. या हल्लयात ३ जणांचा मृत्यू झाला, असं विक्रम मिसरी म्हणाले. तसेच पाकिस्तानचे नेते आणि अधिकारी दहशतवाद्यांच्या अंत्यविधीत सहभागी होतात. पाकिस्तान दहशतवाद्यांना नेहमी पाठिशी घालत आलेला आहे, असं विक्रम मिसरी म्हणाले.

**सिंधू जल कराराबाबत पाकिस्तानकडून कधीही सहकार्य नव्हतं**

पाकिस्तानने अनेकवेळा सिंधू जल कराराचं उल्लंघन केलं. याउलट भारताने गेल्या ६० वर्षांत नेहमी सिंधू जल कराराचा सन्मान केला. पाकिस्तानने गेल्या ६ दशकात अनेकवेळा भारतावर युद्ध लादलं. यावेळी देखील पहलगाममध्ये दहशतवाद्यांच्या माध्यमातून निष्पाप नागरिकांचा जीव घेतला. पण आता आमच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर जोरदार प्रत्युत्तर दिलं जाईल.

पाकिस्तानात ओसामा बिन लादेनही लपला होता. खरंतर पाकिस्तान हे दहशतवाद्यांचा अड्डाच आहे. पठाणकोटच्या हल्ल्यात जैश-ए-मोहम्मदच्या सहभागाचे पाकिस्तानला पुरावे दिले होते. पण पाकिस्तानने प्रत्येकवेळी दहशतवाद्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. अनेकदा पुरावे देऊन पाकिस्तानने दहशतवाद्यांना पाठिशी घातलं. पाकिस्तानी ध्वज गुंडाळून दहशतवाद्यांना पाकिस्तानात मानवंदना दिली गेली,असेही त्यांनी स्पष्ट केले.

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार?

राज्याच्या राजकारणात गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याबाबतच्या चर्चा सुरू आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोन्ही नेते अलीकडे वेगवेगळ्या कारणास्तव तीनदा एकत्र आल्याचे पहायला मिळाले आहे. व्हीएसआयच्या बैठकीत तर पवार-काका, पुतण्यांमधील जवळीक अधिक तीव्रतेने जाणवली होती. अशातच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत जावे, असा मतप्रवाह पक्षात असल्याची माहिती शरद पवार यांनी दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### कोकणात ५ जूनला आगमन

होताना दिसत आहे. राज्याच्या मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून यलो अलर्ट देण्यात आला आहे.

सामान्यतः मान्सून १८ ते २२ मे दरम्यान अंदमान-निकोबारमध्ये दाखल होतो. मात्र, यंदा बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागरातील पाण्याचे तापमान झपाट्याने वाढल्यामुळे, मोठ्या प्रमाणात बाष्प निर्माण होत आहे. परिणामी, हवामानात बदल होऊन बाष्पयुक्त ढगांची निर्मिती वाढली आहे. त्यामुळे मान्सूनची हालचाल अधिक लवकर सुरू झाल्याचे हवामान अभ्यासकांचा अंदाज आहे. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, या घडामोडींमुळे मान्सून केरळमध्येही नेहमीपेक्षा पाच ते सहा दिवस आधीच दाखल होण्याची शक्यता आहे. मात्र केरळसाठी नेमकी तारीख हवामान विभागाने अद्याप जाहीर केलेली नाही.

दरम्यान, एप्रिल महिन्यातील वाढलेल्या उकाड्यातूनही बाष्पीभवन प्रक्रियेला वेग आला असून, त्यातूनच राज्यात पावसाच्या सरींची जोरदार बरसात होत असल्याचं पाहायला मिळत आहे. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार पुढील २४ तासांमध्ये या परिस्थितीत फारशी सुधारणा होणार नसून राज्यात सर्वत्र ढगाळ वातावरण पाहायला मिळेल. काही भागांमध्ये ऊन सावलीचा खेळही पाहायला मिळेल.

ढगाळ वातावरण आणि पावसाची हजेरी यामुळं बहुतांश भागांमध्ये तापमानाच घट झाली असून, ४० अंशांहूनही कमी झाल्याचं स्पष्ट होत आहे. गुरुवारीही राज्यात कोकण किनारपट्टीला लागून असणाऱ्या मुंबईसह ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. यावेळी काही ठिकाणी जोरदार वाऱ्यांसह पावसाचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

कोकण आणि विदर्भातील काही जिल्ह्यांचा दक्षतेचा इशारा देण्यात आला असून, या भागांमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्र प्रामुख्यानं अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता असून काही भागात हलक्या सरींची बरसात अपेक्षित आहे. राज्यात पुढचे पाच दिवस वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला असून विदर्भ आणि मराठवाड्यावर याचा सर्वाधिक परिणाम होईल असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

### झेडपी कर्मचाऱ्यांच्या मंगळवारपासून बदल्या

बदल्या होऊ शकल्या नव्हत्या. निवडणुकीनंतर बदल्या होतील, असे वाटत होते. मात्र शासनाकडून काहीही आदेश आले नाहीत. त्यामुळे राज्यभर या बदल्या रखडल्या. मात्र, यंदा बदल्या करण्यात येणार असून त्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाने विभागनिहाय वेळापत्रक जाहीर केले आहे. मुख्यालयातील व तालुक्यातील रिक्त पदे भरताना पदांचा समतोल राखण्यात यावा. तसेच आदिवासी दुर्गम भागातील पदे प्राधान्याने भरावीत. त्यानंतर नंतर विनंती बदली व अखेर प्रशासकीय बदलीने तालुकानिहाय पदांचा समतोल राखण्यात यावा, अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी दिल्या आहेत. तालुकास्तरावरील बदल्या १९ ते २३ मे या कालावधीत करण्यात येतील, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

### इथेनॉल उत्पादनासाठी ५२ लाख टनांपर्यंत वाढवले तांदळाचे वाटप

निश्चित करण्यात आली आहे. सरकारने निश्चित केलेल्या प्रति लिटर ५८.५० या दराने तेल विपणन कंपन्यांना २४५ कोटी लिटर इथेनॉल विकून, त्यांचे उत्पन्न सुमारे १४,३०० कोटी होण्याची अपेक्षा आहे.